# परिशिष्ट क्रमांक ३

## परिशिष्ट नं.3

### मुलाखतीत आढळलेल्या कांही विशेष गोष्टी.

1) श्री रमेश वैदु यांनी मुलाखतीत सांगितल्यावरून ...

त्यांचे आजोबा श्री गोविंद लोंढया वैदु हे रानडुकराची शिकार करण्यात पटाईत होते. ते डुकरांच्या पावलांवरून डुक्कर एकटा आहे की कळप आहे ? नर आहे की मादी आहे ? कळप असल्यास नर किती आहेत ? माद्या किती आहेत ? पिले किती आहेत ? हे ओळखत असत. पुण्यामध्ये ते व त्यांचे जातभाई पेशव्यांना शिकारीमध्ये मदत करीत. इतर सरदार लोक त्यांना शिकारीसाठी बोलावून घेत. वैदुंच्या या कसबावर खूष होऊन पेशव्यांनी त्यांना हडपसरची जागा फुकट दिली.

2) या जमातीत मुलीस जोडीदार निवडीचा अधिकार आहे. आई वडील जबरदस्तीने तिचे लग्न लावू शकत नाहीत. या जमातीत एका मुलीचे एका अपंग मुलावर प्रेम होते. तिच्या आई वडीलांनी तो मुलगा नापसंत करून तिचे लग्न दुस-या मुलाशी ठरविले. त्यानंतर जातपंचायतीच्या लोकांनी पंचायतीत त्या मुलीस तिची पसंती विचारली. तिने त्या अपंग मुलाशी लग्न करावयाची इच्छा व्यक्त केली. तेव्हां जातभाईंनी तिच्या आई वडिलांच्या संमतीशिवाय तिचे लग्न त्या अपंग मुलाशी लावून दिले. आता ते जोडपे जमातीत रहात आहे.

3) श्री उत्तम देवाप्पा शिर्के यांच्या मुलाखतीवरून ...

श्री उत्तम शिर्के हे श्री यल्लप्पा वैदु यांच्या बहिणीचे पती आहेत. ते लहान असताना श्री यल्लप्पा वैदु यांच्या बरोबर युनियन मिशन स्कूल मध्ये शिकले. शाळेकडून त्यांना कपडे मिळत असत. आई वडिल रोज कामासाठी बाहेर फिरत असत. सुट्टीच्या दिवशी ही मुले सकाळी गांवाच्या उकीरडयावर जाऊन मेलेल्या कोंबडया आणत. त्या सोलून त्यात पाणी कांदा, मीठ, मिरची, भाकरीचे तुकडे उकळत व खात असत. एकदा न्यू इंग्लीश स्कूलमध्ये शिक्षक पालक मेळावा होता. तिथे जेवणे चालू झाल्यानंतर शाळेचा ड्रेस अंगात घालून हे जेवायला बसले. पण रखवालदाराने हा मुलगा आपल्या शाळेचा विद्यार्थी नाही हे ओळखून त्यांना जेवणावरून हाताला धरून ओढले व हाकलून दिले. पानावरून उठताना त्यांनी जेवढे पदार्थ खिशात, हातात भरता येतील तेवढे भरले व बाहेर येऊन खाल्ले. जेवणे झाल्यानंतर जेव्हां पत्रावळी नाल्यात टाकण्यात आल्या, तेव्हां त्यांनी त्या

पत्रावळया नाल्यातून काढून त्यावरचे अन्न गोळा करून घरच्या लोकांसाठी आणले. असे जीवन त्यांना जगावयास लागले आहे.

4) या जमातीत पूर्वी मुलींची विक्री होत असे. त्यांच्या काकी ' दुर्गव्वा गोविंद शिर्के ' यांचे वागणे, बोलणे, चालणे, वर्तन चांगले नव्हते म्हणून तिचे नव-याने तिला 1,000 रूपये घेऊन माकडवाल्यांना विकून टाकले. धारावी येथील ' शंकर ' या माकडवाल्या जमातीतील व्यक्तीस तिला विकले आहे.

5) चिंच्या नांवाच्या एका व्यक्तीने मुलीच्या केसात भोवरा असल्याने तिला अपशकुनी समजून ठार मारले आहे.

6) यांच्या वडिलांच्या अंगात येत असे. एकदा जमातीच्या कार्यकर्त्यांनी त्यांना तापलेल्या सळईने भाजावयाची धमकी दिली. देव येणे हा प्रकार खरा असेल तर तुम्हाला भाजणार नाही असे सांगितले. तेव्हांपासून त्यांच्या अंगात येण्याचा प्रकार बंद झाला. या पध्दतीने जमातीतील अंधश्रध्दा दूर करण्यांत त्यांनी यश मिळविले आहे.

7) या जमातीत सुरूवातीस कुटुंब नियोजन करण्यास लोक घाबरत असत. शस्त्रक्रिया करून घेत नसत. संतती नियमन करण्यास स्त्रिया व पुरूष देवाचा कोप होईल म्हणून नकार देत. जमातीमध्ये संतती होऊ नये म्हणून शस्त्रक्रिया करून घेणारी पहिली स्त्री म्हणजे श्री उत्तम शिर्के यांची आई होय. त्यांची आई एकदा खूप आजारी पडली. डॉक्टरांनी संतती नियमन ऑपरेशन करण्याचा सल्ला दिला. पण वडिल यासाठी तयार नव्हते. तेव्हां आईचे प्राण वाचविण्यासाठी चुलत्यांना दवाखान्यांत नेले व त्यांना तिचे पती म्हणून ऑपरेशनसाठी संमती द्यावयास सांगितले व स्वतःच्या आईचे प्राण वाचविले. यानंतर जमातीत दुसरी संतती प्रतिबंधक शस्त्रक्रिया त्यांची पत्नी सौ.उषा शिर्के यांची करून घेतली. यानंतर जमातीतील स्त्रियांची शस्त्रक्रियेबद्दलची भिती गेली व आता जवळजवळ 80 टक्के स्त्रियांनी ही शस्त्रक्रिया करून घेतली आहे.

8) सौ. यल्लव्वा राजेश शिर्के यांच्या मुलाखतीवरून ...

सौ. यल्लव्वा या नेहमी आजारी असत. सर्व देवांना नवस करून सुध्दा गुण आला नाही. त्या काळांत एका समाज सेविकेने जमातीत येऊन स्त्रियांना मार्गदर्शन केले. पण जमातीच्या व देवाच्या कोपाच्या भितीने त्या दवाखान्यांत गेल्या नाहीत. जास्त आजार बळावल्यानंतर निरूपाय होऊन

त्या दवाखान्यांत गेल्या व थोडयाच काळात ब-या झाल्या. आता त्या नवस करत नाहीत. आजारी पडल्यास दवाखान्यांत जातात.

9) सौ. इंदू यल्लप्पा वैदु यांच्या मुलाखातीवरून ...

यांचे वडील औषध विक्री करीत. त्यांनी वडिलांबरोबर जहाजातून प्रवास केला आहे. त्यांच्या बाबांजवळ झोळी व आईजवळ बोचके असे. एकदा इंदूबाईंना खुप-या झाल्या. संध्याकाळपर्यंत त्यांचे डोळे खूप दुखू लागले. लाल होऊन सुजले. तेव्हां त्यांच्या वडिलांनी नागवेलीचे पान घेतले. त्यात तंबाखू, कात घातला. पान चघळून त्याचा लगदा एका फडक्यांत घालून रस काढला. तो रस डोळयात घातल्यानंतर खूप झोंबू लागले. पण सकाळ झाल्यानंतर त्यांचे डोळे चांगले उघडले. वेदना कमी झाल्या व दोन - तीन दिवसांतच डोळे पूर्ण बरे झाले.

10) सौ. इंदुबाई इयत्ता 9 वी पर्यंत शिकल्या आहेत. त्या ' युनियन स्कूल ' मध्ये जात. दरवर्षी बायबल मधील काही भाग पाठ करून युरोपियन साहेबास म्हणून दाखवला की, त्यांची शाळेची फी माफ होत असे. त्यांना वर्षाची पुस्तके मिळत असत व शाळेचा गणवेश मिळत असे. सुट्टीमध्ये त्या ग्रामीण भागात मणि - पोत, औषध विक्रीसाठी जात. तेव्हां शिकलेली वैदीण म्हणून ग्रामीण स्त्रिया त्यांचे कौतुक करीत असत.

11) सौ. इंदुबाईंच्या डोक्यांत भोवरा आहे. अशी मुलगी अपशकुनी आहे अशी जमातीत समजूत होती. अशा मुलीचा नवरा मरतो या समजुतीमुळे जमातीमध्ये लग्न करण्यास कोणी तयार नव्हते. ही समजूत खोटी आहे हे पटविण्यासाठी श्री यल्लप्पा वैदु यांनी त्यांच्याशी लग्न केले. आजपर्यंत त्यांचे पती, त्यांचा संसार सुखात आहे. अशा अनुभवातून जमातीच्या अंधश्रध्दा दूर होत गेल्या आहेत.

12) श्रीमती काट्यावा गोविंद शिर्के यांच्या मुलाखातीतून ...

या लहान असताना यांचा विवाह ( पाळण्यात ) एका तरूणाबरोबर झाला. त्या मोठया होईपर्यंत त्यांचे पती मरण पावले. यानंतर दुस-या तरूणाबरोबर त्यांचा म्होतुर लावला. यासाठी दुस-या पतीने तीनशे रूपये वधु मूल्य दिले. हा दुसरा पती त्यांच्यापेक्षा वयाने लहान होता. त्यांने पुन्हा चार लग्ने केली पण त्या सर्व स्त्रियांनी त्याला सोडून दिले. त्याच्या मृत्यूनंतर श्रीमती काटवाया यांनी स्वतःच्या व सवतीच्या सर्व मुलांचा सांभाळ केला.

13) त्या तरूण असतांना स्वातंत्र्यपूर्व काळातील त्यांना आलेला अनुभव त्यांनी सांगितला. जमातीमध्ये त्या काळांत पुरूष व्यवसाया निमित्त बाहेर रहात असत. जमातीमध्ये स्त्रिया व मुले रहत. अशा स्त्रियांना त्रास देण्यास रात्री गोरे सोजीर येत. स्वत:ची अब्रू वाचविण्यासाठी या स्त्रिया पुरूष वेश करीत व डोक्यास पगडी बांधत असत. तव्याचे काळे मिशा म्हणून लावीत असत व आवाज बदलून 'इधर कोई बीबी नहीं है साब ' असे म्हणत.

14) श्रीमती काटयावा व त्यांचे पती मणि - पोत विकण्यासाठी, औषधे विक्रीसाठी ग्रामीण भागात जात असत. त्यांचे पती खूप आजारी पडले. सर्व प्रकारचे नवस केले, पण गुण आला नाही. तेव्हां त्यांचे पती चिडले व म्हणाले ' इकडे आण काठी, देवालाच झोडपतो ' यानंतर त्यांनी वैद्यकीय उपचार घेतले व त्यांचा रोग बरा झाला.

अशा विविध अनुभवातून जमातीच्या अंधश्रध्दा दूर होत गेल्या आहेत.

xxxxxxxxxx

## वैदु जमातीतील गाणी

1) वैदु स्त्री ग्रामीण भागात व्यवसायासाठी भटकत असते. मणि - पोत विकून धान्य, पैसा मिळविते. यासाठी समोरच्या स्त्रिस खूष करण्यासाठी ती पुढील गाणे म्हणते -

गंगाई बय्या, भागाई बय्या,
येमायी बय्या, तुकाई बय्या,
लक्ष्मी आई बय्या, - बुरगुंडा होईल ।
सख्याची आय, तुक्याची आय,
यमन्याची आय, वाढ ग माय ।
बब्याची आय, चिंगीची आय,
राघोची आय, वाढ ग माय
बुरगुंडा होईल ।
( बुरगुंडा होणे = मुलगा होणे )

2) लग्नामध्ये स्त्रिया पुढील तेलगू गीत म्हणतात. या गाण्याची पुन्हा पुन्हा पुनरावृत्ती होत असते. ते गीत -

' यावरी मंगलवडे, मनुरी मंगलवडे ।
यय्या, अय्या लेश नाडु ।
येच्या बेडताडे यावरी कुंबड वडे ।
मनुरी कुंबडवडे ।
अर्थ - कोण्या गावचा वारिक, आपल्याच गावचा वारिक,
कोण्या गावचा कुंभार, आपल्याच गावचा कुंभार इ.

3) शंकराची प्रार्थना पुढील प्रमाणे म्हणतात ...
शंकरी येई नाराई नानु । नारायिना, नारायिनानुये ।
ब्रम्हलोक ए ब्रम्हणी नुये, ब्रम्हलोक रे ब्रम्हणीनु ।
शिरतीचे शम्मनिनुये । शिरतीचे शम्मनिनुये ।

आदि नारायणा, आदि नारायणनुए ।

ब्रम्हलोकए ब्रम्हणीनुए ।

पृथ्वीएरी नारायनानुरे ।

पृथ्वीयेरी नारायनानुरे ।

शिवशंकरी की यरायर, शिवशंकरी पार्वती ताई की यरर् ।

ब्रम्हलोक ए ब्रम्हणीनुए ...

भोळा ए शंकरीनिनु, पंचमुखी ए परमेश्वरानु ।

शिवाशंकरी नारायनकुंवर, इंद्रनगरी दारीकीरेनु ।

कय्यम गदेनु ।

आदि नारायण, आदि नारायण ।

4) लग्नाचे वेळी मुलीने आईबापापोटी जन्म कसा घेतला ? नाव कसे कमविणार ? लग्न झाल्यावर वागायचे कसे ? हे पुढील गाण्यात सांगितले आहे.

अंदि अंदि जिभ इद्बाळे रचपना ।

अरण्यादि कुंडानि जयबंदि नानु ।

अरत्याना वंताना अरोकी बेसिंदी,

शिंताका वंताना देवीकी बेटी ।

चिन्नल गोलीली, पैददल गोलीली ।

चिलकलु पेनलेनु तेस्तामु ।

बडबडू लगनेऊ तिन्नेकी कंचामु ।

कठनेकी काई बस्तमु लेकुंडेना ।

शीतकंठोनी रुक काळूलै पारतावे ।

यल्लीकनी सुखामु फकडमु दुखामु ।

ऐवगुरू मुतैदु पटपचडु केंदु ।

मायानु शिंगारू वनाकुलेशनु ।

अप्परम् शिंकुले अग्नीच बाणाले ।

सुरतीलु बागालु श्री देवलाया यल्लंगा ।

शीतलशेची शिंगारीची मिरवंगा ।

सारांश ...

गरीब बापाने फक्त एका घडप्यावर मुलीचे लग्न लावले आहे. सर्व शहाणे लोक जमले आहेत. चिंचेच्या पानाची बत्ती लावली आहे. नवरीच्या डोळयातून पाणी वहात आहे. नवरा नवरीस आणावयास चालला आहे. वरून अग्नीबाणासारखा पाऊस पडतो आहे. नव-याला सुख तर बायकोस दु:ख होत आहे. नवरीचा हिरवा चुडा भरून शृंगार झाला आहे. दोन चिमण्यांचे लग्न लावण्यास शहाणे जमा झाले आहेत. सर्व देवतानो एकत्र येऊन लग्नास मदत करा.

xxxxxxxxxxx

( प्रस्तुत जमातीत क्षेत्रकार्य करीत असताना संशोधिकेचा बराच वेळ या जमातीत व्यतित झाला. या कालखंडात वैदु भाषेतील जे शब्द तिच्या कानावर पडले ते नमुन्यादाखल संग्रहित केले आहेत )

## वैदु जमातीतील रोजच्या बोलीभाषेतील शब्द

### (अ) नाते दर्शक शब्द

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1 नवरा | .. | मोगुड | 2. बायको | .. | पेनलम् |
| 3. मुलगा | .. | बुरगुंडा, पिलगाड् | 4. मुलगी | .. | बुरगुंडी, पिल्ल |
| 5. सासू | .. | आत्ता | 6. सासरा | .. | मामा |
| 7. स्त्री | .. | आडुळ | 8. पुरूष | .. | मोगोल |
| 9. लहान मूल | .. | चिन्नी पिलगड् | 10. नणंद | .. | मडदाल् |
| 11. दीर | .. | मडदी | 12. बहिण | .. | शेलील |
| 13. मावशी काकू | .. | शिनाम् | 14. काका | .. | आय्या |
| 15. भाऊ | .. | तुम्मुड | 16. मेहुणा | .. | बामदडी |
| 17. आजोबा | .. | ताता | 18. आजी | .. | आव्वा |
| 19. वहिनी | .. | वज्ञा | | | |

### (ब) प्राणी ...

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1. डुक्कर | .. | पन्दी | 2. गाढव | .. | गाढदी |
| 3. बकरा | .. | मॅक कोस्तड | 4. कोंबडी | .. | कोडी |
| 5. मांजर | .. | काचकीन् | 6. माकड | .. | कोत |
| 7. कुत्रा | .. | कुकु | 8. कावळा | .. | काक |
| 9. साप | .. | पाम् | | | |

### (क) जेवणातील पदार्थ ...

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1. मटण | .. | कंड | 2. भाकरी | .. | मोक |
| 3. दूध | .. | पाल | 4. दारू | .. | सराय |
| 5. आमटी | .. | पुंचु | 6. चपाती | .. | गोदुमरूटी |
| 7. अंडी | .. | गोदमुळ | 8. मासा | .. | श्याप |
| 9. सुकट | .. | रोईल | 10. कांदा | .. | उलगड |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 11. वांगी | .. | वंकाल | 12. लसूण | .. | येलगाड |
| 13. खोबरे | .. | खोबिर | 14. पाणी | .. | नीर |
| 15. भाजी | .. | कूर | | | |

(ड) धान्य ...

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1. गहू | .. | गोदमूळ | 2. तांदूळ | .. | बीम |
| 3. डाळ | .. | ब्याळ | 4. ज्वारी | .. | गिंजल |

(इ) फळे...

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1. नारळ | .. | काय | 2. केळी | .. | बालपोंड |
| 3. आंबा | .. | मामडकाय | 4. बोर | .. | बोरीपुंडल |

(ई) धार्मिक शब्द ...

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1. देव | .. | देवड् | 2. शंकर | .. | शिवुड |
| 3. दुर्गादेवी | .. | यल्लमकळा देवी | 4. सण | .. | पंडग |
| 7. नवस बोलणे | .. | नवस तेष्णम् | | | |

(उ) कपडे, बिछाने इ. संबंधी...

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1. साडी | .. | कॉक | 2. परकर | .. | गिगिर |
| 3. चादर | .. | पाचडम् | 4. उशी | .. | तालाप |
| 5. शर्ट | .. | अंगी | 6. धोतर | .. | दावित् |
| 7. चोळी | .. | रेक | 8. मंगळसूत्र | .. | काळीपुसुल |
| 9. कर्णफुले | .. | कम्मल | 10. चप्पल | .. | चपुल |

(ऊ) इतर प्रचलित शब्द ...

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1. औषध | .. | मंदु | 2. झोळी | .. | तिती |
| 3. मर्तिक | .. | सचबिनड् | 4. पोलीस | .. | नलांगुळ |
| 5. पुनर्विवाह | .. | कुडगाट | 8. दुस-या जमातीतील स्त्री | .. | मशी |
| 7. वारिक | .. | मंगलवडे | 10. करणे | .. | पाताळ |
| 11. झोपडी | .. | इल्ळ | 12. झाड | .. | चोटु |

(ए) भांडी ...

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1. परात | .. | गिन्नी | 2. तांब्या | .. | चमु |
| 3. पातेले | .. | बोगनकना | | | |

(ऐ) वाक्ये ...

| | | | |
|---|---|---|---|
| 1. लग्न जमले .. | पेनलीं जमाचीन | 2. जत्रा भरली .. | जत्रा बराचीन |
| 3. चांगले होऊ दे.. | मंचित कानी, बाग कानी | 4. या, बसा | वा कुयो |
| 5. आजार कमी होईल .. | तक्वा ताळी | 6. सावधान .. | जा ऽ भो ( लग्न लावताना ) |
| 7. दूध येऊ दे .. | पालपडी | 8. जेवण झाले का? .. | रोटी तिन्नावा |
| 9. सांगते थांब .. | चेपता ताम । | 10. शाळेत जा .. | शाळा पो |
| 11. वेडयासारखी बोलते .. | पिचुळक कुस्त | 12. उनाड मुलगा आहे.. | टुकरला तिरगाडताड |
| 13. आयतं खायला पाहिजे .. | नुस्ता तुन्ने कावाला | 14. गप्प बैस .. | गप कुच |
| 15. पातेले आण .. | बोगन कना | 16. पाणी आण .. | नीर कना |
| 17. नवीन लग्न झाले आहे.. | कोत्तं पेंडली आईनद् | 18. पूजा कर .. | देऊड पेट, देऊड पूजते |
| 19. ओटी भरणे .. | इल्लुर्निपित | 20. गरोदर आहे.. | नुळ बेसकुंद |
| 21. बाळंत झाली .. | उतलाडीन | 22. भांडण करणे .. | लडाई पडणे. |
| 23. पाऊस आला .. | वान वच्च् | 24. कुंकू लावते.. | कुंकू पेडताम् |

*************